# पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

कक्ष -९ (भरती कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१
दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४. ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१२६४/२०२६, दि. १३/ ०७ /२०२६.

## नियुक्ती सुचना क्र. २४
## मुंबई पोलीस शिपाई भरती २०२२-२३

**विषय :- मुंबई पोलीस शिपाई भरती २०२२-२३**
**पोलीस शिपाई पदावर अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत.**
**संदर्भ :- जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१८०७/२०२५, दिनांक ०६/०८/२०२५.**

उपरोक्त संदर्भानुसार मुंबई पोलीस शिपाई पदाची अंतिम निवड यादी कागदपत्र पडताळणी व भरती निकषाच्या अधिन राहून गुणवत्तेनूसार प्रसिध्द करण्यात आली आहे. चारित्र्य पडताळणी अहवाल निरंक प्राप्त झालेल्या तसेच सामाजिक व समांतर आरक्षणातील प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून, तसेच वैद्यकिय चाचणी घेण्यात येत असून जे उमेदवार वैद्यकिय चाचणीत पात्र ठरतील अशा उमेदवारांना दिनांक १७/०७/२०२६ रोजी नियुक्ती आदेश प्रदान करण्यात येतील.

**सोबतच्या यादीत नमूद केलेल्या ०९ उमेदवारांनी दिनांक १७/०७/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता वैद्यकिय चाचणी तथा नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी प्रशिक्षणास जाण्याच्या तयारीनीशी पोलीस रुग्णालय, नागपाडा, मुंबई येथे हजर राहावे. सदर दिवशी जर उमेदवार नियुक्ती आदेश स्विकारण्यासाठी गैरहजर राहिले तर सदर गैरहजर उमेदवारांस मुंबई पोलीस शिपाई पदावर नियुक्त होण्याचे स्वारस्य नाही असे गृहित धरुन त्यांची अंतिम निवड यादीतील निवड कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल, तसेच त्यांच्या जागी अंतिम प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्तीसाठी संधी देण्यात येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

उमेदवारांना नियुक्ती पत्र स्विकारण्याकरिता बोलाविण्यात आले म्हणून नियुक्तीचा प्राधिकार प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये. भरती प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरल्यास निवड रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास आहेत, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच नमूद केलेल्या संचनांचे पालन करण्यात यावे.

**नियुक्तीसाठी येताना न चुकता सोबत आणावयाच्या आवश्यक बाबी :-**

१) भरती ओळखपत्र (मैदानी चाचणी/लेखी परिक्षेचे)
२) ०४ पासपोर्ट साईस फोटो
३) आधार कार्ड व पॅन कार्ड.
४) दैनंदिन गरजेच्या वस्तू घेऊन पोलीस प्रशिक्षणाच्या तयारीने न चुकता हजर रहावे.

५) आवेदन अर्जामध्ये नमूद केलेली मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. — (सामाजिक/समांतर आरक्षण सिध्द करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेली प्रमाणपत्रे, वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हता, अधिवास प्रमाणपत्र/रहिवास दाखला, एम.एस.सी.आय.टी. व इतर)

सोबत नियमीत वापरण्यास लागणारे कपडे, विश्रांतीकरिता साहित्य (दरी, मच्छरदाणी, पांघरुण), ताट-वाटी, तांब्या, ग्लास, दाढीचे साहित्य (पुरुषंकरिता), २ पांढऱ्या बनियान, कॅनव्हास शुज (१ जोडी), खाकी नायलॉन सॉक्स (२ जोडी), २०० पानी वह्या (२), १ पेन, गांधी टोपी, १ लोखंडी बकेट, २ ट्राऊझर (महिलांकरिता), २ पांढरे टी-शर्ट इ. साहित्य सोबत आणावे. सोबत "मेस ॲडव्हान्स रु २,०००/- घेऊन यावे."

तसेच संपर्कासाठी दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अद्ययावत ठेवावा. **उमेदवाराने आपल्यासोबत चैनीच्या वस्तू किंवा किंमती वस्तू उदा. सोन्याचे दागिने इ. वस्तू आणू नयेत. अशा वस्तू हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

**विशेष सुचना :-**

१. भरती आवेदन पत्र नसल्यास अथवा अपूर्ण कागदपत्रे/प्रमाणपत्रे असल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही. नियुक्तीसाठी दिलेल्या दिनांकाच्यावेळी गैरहजर राहिल्यास पूर्व सूचना न देता निवड रद्द करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व न चुकता हजर रहावे. सदरची पोलीस शिपाई पदाची अस्थायी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन आहे व सदरहू अटी व शर्ती उमेदवारांस बंधनकारक आहेत.

२. नियुक्तीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवाराने भरती निकषांची/अर्हतेची पुर्तता न केल्याचे आढळून आल्यास नियुक्ती दिली जाणार नाही, अथवा नियुक्तीनंतर पात्रते विषयी त्रुटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

( डॉ. श्रीकांत परोपकारी )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) तथा
सचिव, मुंबई पोलीस शिपाई भरती २०२२-२३
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.

## मुंबई पोलीस शिपाई भरती -2022-23
## दिनांक 17/07/2026 रोजी (सकाळी 10:00 वा.) वैद्यकिय चाचणीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी.

| SR NO | APPLICATION NO | SEAT NO | Name | Gender | DOB | Application Caste | Application Category | Written Test Marks | Physical Test Marks | NCC MARKS | TOTAL MARKS | SELECTION CASTE | SELECTION CATEGORY |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 110101000161449 | 111855 | ARUN DEVIDAS PALVE | M | 23/04/2001 | NT(D) | None | 89 | 43 | 0 | 132 | OPEN | GENERAL |
| 2 | 110101000196501 | 119629 | KIRAN SURESH PATIL | M | 24/05/1996 | OBC | Project Affected | 85 | 39 | 0 | 124 | OBC | Project Affected |
| 3 | 110101000160259 | 110203 | NIMBA PRATAP MAHALE | M | 28/03/1982 | OBC | Ex-Serviceman | 64 | 45 | 0 | 109 | OBC | Ex-Serviceman |
| 4 | 110101000001782 | 139100 | SUNIL CHINDU SAPKALE | M | 16/11/1983 | SBC | Ex-Serviceman | 42 | 28 | 0 | 70 | SBC | Ex-Serviceman |
| 5 | 110101000068194 | 136805 | ARIF KHAJASAB SHAIKH | M | 17/02/2002 | EWS | Earthquake Affected | 84 | 34 | 0 | 118 | EWS | Earthquake Affected |
| 6 | 110101000076325 | 109586 | NITIN SUDHAKAR THOKE | M | 28/05/1982 | NT(C) | Ex-Serviceman | 63 | 47 | 0 | 110 | NT(C) | Ex-Serviceman |
| 7 | 110101000239491 | 123936 | SUMIT SUBHASH SAWANT | M | 15/02/1996 | SEBC | Police Child | 80 | 38 | 0 | 118 | SEBC | Police Child |
| 8 | 110101000050271 | 109538 | SANDIP BABASAHEB THORVE | M | 09/07/1982 | NT(D) | Ex-Serviceman | 69 | 47 | 0 | 116 | OPEN | Ex-Serviceman |
| 9 | 220101000043635 | 101381 | USHA SURESH DABERAO | F | 14/07/2000 | ST | Female Reservation | 78 | 41 | 0 | 119 | ST | FEMALE |